OFFICE OF THE
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY,** KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI ✆ TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 13-Mar-15 6:38:59 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,

विषय :- परीक्षा अर्जांसाठी ॲडमिशन डाटा अपलोड करण्याबाबत आणि अपरिहार्य कारणास्तव मॅन्युअली फॉर्म स्विकारण्याबाबत...

महोदय,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, suk.digitaluniversity.ac.in या पोर्टलवरील ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ मध्ये झालेल्या परीक्षांपैकी १७२ परीक्षांचे निकाल लावलेले आहेत. त्यामध्ये १,६४,००० विद्यार्थी परीक्षेस बसलेले असून त्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांचे निकाल बिनचूकपणे जाहीर झालेले आहेत. कांही विद्यार्थ्यांच्या निकालात कांही प्रमाणात त्रुटी असल्याचे दिसते त्याची कारणे खालीलप्रमाणे-

- यापैकी कांही विद्यार्थ्यांनी **suk.digitaluniversity.ac.in** या संकेतस्थळावरुन अर्ज भरणे आवश्यक असतानाही परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या **unishivaji.ac.in** संकेतस्थळावरुन भरलेले असून महाविद्यालयांनी त्याबाबत परीक्षा विभागास कळविले नसल्याचे निर्दशनास आलेले आहे. यामध्ये बहुतांश विद्यार्थी हे जुन्या अभ्यासक्रमांचे म्हणजेच १० अंकी पीआरएनचे आहेत.
- विद्यार्थ्यांनी **suk.digitaluniversity.ac.in** या संकेतस्थळावरुन अर्ज भरणे आवश्यक होते. तथापि त्यांनी मॅन्युअली फॉर्म भरलेले आहेत. महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचा ॲडमिशन डाटा अपलोड केलेला नसल्याने परीक्षा अर्ज प्रणालीद्वारे जनरेट झालेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांना आयत्या वेळी ऑड नंबर देण्यात आले. या विद्यार्थ्यांना प्रणालीद्वारे बैठक क्रमांक जनरेट झालेला नसल्याने त्यांचे गुण प्रणालीतून स्विकारले गेले नाहीत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचा निकाल
- ज्यांचा निकाल प्रलंबित किंवा RR दिसतो त्या विदयार्थ्यांच्या निकालामध्ये Term Work, Odd Number, मुल्यांकन केंद्राकडून प्राप्त न झालेले गुण, अगोदरच्या परीक्षेच्या निकालामधील असलेल्या त्रूटी इत्यादी कारणांमुळे सदर विद्यार्थ्याचे निकाल प्रलंबित किंवा R.R. किंवा परीक्षेस बसूनही Absent दिसतात. त्यामध्ये जसजसे महाविद्यालयाकडून गुण प्राप्त होत आहेत त्यांचे गुण घेऊन निकाल पुन्हा प्रोसेस केला जात आहे व परीक्षा अर्जही जनरेट करुन देण्यात येत आहेत.
- काही विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्राची माागणी करतात त्या परीक्षा केंद्रावर जाऊन न बसता इतर परीक्षा केंद्रावर परीक्षा देतात, अशा विद्यार्थ्यांची माहिती संकलित करणे अडचणीचे होते.
- काही विद्यार्थी बसलेल्या परीक्षेचे काही पेपर एका परीक्षा केदांवर तर काही पेपर दुस-या परीक्षा केंद्रावर देतात, ही माहिती परीक्षा विभागाकडे कळविलेली नसल्याने उपलब्ध नसते. त्यामुळे निकाल जाहीर करण्यात अडचणी निर्माण होतात. विशेषत: दूरशिक्षण केंद्रामार्फत परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांमध्ये अशा प्रकारच्या त्रूटी अधिक आढळून येतात.

या सर्व अडचणींचे निराकरण करण्यासाठी डियुडिसीची संपूर्ण टीम आणि संबंधित परीक्षा विभागाचे कर्मचारी व अधिकारी दिवसरात्र काम करीत आहेत. ज्या विद्यार्थ्यांच्या निकालात त्रूटी आहेत, परीक्षा अर्ज जनरेट होण्यात अडचणी आहेत किंवा अन्य तांत्रिक बाबींमुळे अद्यापि निकाल दिसत नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या

OFFICE OF THE
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI ✆ TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 13-Mar-15 6:38:59 PM



निकालातील त्रुटी दूर करून निकाल सुधारित करण्याचे काम सुरू आहे. महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठात पुन्हा पुन्हा पाठवू नये. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी आपले तपशीलवार अर्ज विद्यापीठात जमा केलेले आहेत त्यांनी पुन्हा विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. ***त्याचे निकाल सुधारित झाल्यानंतर त्यांचा निकाल संकेतस्थळावर दिसेल. तसेच त्यांचा पुढील परीक्षेचा अर्ज जनरेट होईल. त्यांचे परीक्षा अर्ज नियमित शुल्काने स्विकारण्यात येतील. या विद्यार्थ्यांना विलंब शुल्क आकारण्यात येणार नाही. परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पात्र असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास परीक्षेस बसण्यापासून वंचित ठेवले जाणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचे पुढील सेमेस्टरचे जनरेट झालेले परीक्षा अर्ज इनवर्ड करून पुढील कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांच्या समस्या संकलित करून महाविद्यालयांच्या प्रशासकीय कर्मचा-यास विद्यापीठात पाठवावे. विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठवू नये.***

महाविद्यालयांनी खालील बाबींची पूर्तता तात्काळ करावी.

१. सोबत पाठविण्यात आलेल्या परिशिष्टातील क्र. १ च्या शिटमध्ये अंडर ग्रज्युएटच्या विद्यार्थ्यांचा डाटा पाठविण्यात आलेला आहे. त्या विद्यार्थ्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या सेमेस्टरसाठी आपापल्या महाविद्यालयांच्या लॉगीनमधून ॲडमिशन करून परीक्षा अर्ज जनरेट करण्याबाबतची रिक्वेस्ट लॉगीनमधून पाठविण्याची आहे.
२. अपरिहार्य कारणास्तव मॅन्युअल फॉर्म भरून घेतल्यास त्यांचा तपशील शिट-२ मध्ये भरून ती सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मॅन्युअल परीक्षा अर्जासह संबंधित परीक्षा विभागाकडे जमा करावी. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विना विलंब शुल्काने भरून घ्यावेत.
३. ज्या महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.ए. व एम. कॉम. आहेत त्यांच्यासाठी शिट-३ मध्ये पुढील सेमेस्टरसाठी माहिती भरण्यासाठी डेटा देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे विषय आणि कोड भरून शिट-३ मध्ये भरून ती सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मॅन्युअल परीक्षा अर्जासह संबंधित परीक्षा विभागाकडे जमा करावी. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज विना विलंब शुल्काने भरून घ्यावेत. मात्र सदर माहिती अपडेट करण्यासाठी यथावकाश महाविद्यालयातील संबंधित प्रशासकीस कर्मचा-यास विद्यापीठात पाठविण्यात यावे.
४. बी.एस्सी., बीसीएस इत्यादी ज्या परीक्षांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २३ मार्च २०१५ पासून सुरू होणार आहेत. त्या परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांसाठी बैठक क्रमांक देण्यात आलेले आहेत. तथापि वर उल्लेख केलेल्या कोणत्याही कारणास्तव निकाल जाहीर व्हावयाचा राहिला असल्यास व त्यामुळे त्यांचा परीक्षा अर्ज जनरेट झाला नसल्यास अशा विद्यार्थ्यांची परीक्षा पीआएन नंबरवर घेण्याबाबत सूचना संबधितांना देण्यात येत आहेत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी अस्वस्थ न होता शांतपणे परीक्षा द्यावी.

वरील माहिती विद्यार्थ्यांसाठी आणि सर्व संबंधित घटकांसाठी नोटीसबोर्डवर ठेवण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
(श्री. महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

१. सर्व परीक्षा विभागप्रमुख व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव यांना माहितीसाठी

OFFICE OF THE
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI ✆ TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 13-Mar-15 6:38:59 PM